श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कला व श्रीमती चंपाबेन
भोगीलाल वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय
१, नाथीबाई ठाकर्सी रोड, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी : २२०९३७८९, २२०३१८७९. विस्तार : १२१९/१२२०
www.sndtcollegemumbai.org
Email: collegemumbai@sndt.ac.in
NAAC B+ Grade (With CGPA 2.68)
स्थापना १९३१

Report of SVEEP activity by Dept. Music

करू नमन संविधानाला
हो हो हो s s s
करू नमन संविधानाला
हक्क ज्याने दिला
स्त्रियांना मतदान करण्याचा
राजकारणी सक्रिय होण्याचा
भारताचे राज्य घडवण्याचा
हो जी s जी जी
मतदार राणी जागी हो
भारताच्या उज्ज्वल भविष्याची निर्माती हो
संविधानाने दिलाय तुला अधिकार
कर मतदान आणि हो सहभागी राजकारणात.

ऐकाग साऱ्या जणी s ss
ऐकाग साऱ्या जणी
आम्ही मिळूनी सर्व मैत्रिणी
मतांचे देऊ अमूल्य दान
भारताला देऊ नेतृत्व छान
लोकशाहीचा राखू मान
हो जी s जी जी

चला मिलूनी करू मतदान
हो जी s जी जी

This " Matadanacha Powada" is written and composed by Dr. Kalpana Jain , HOD of Music department. This powada was composed to raise awareness about voting among women. It was performed by the students of the Music Department at the university as well as at the election office. The Election Office Head also took note of it.

# 'एसएनडीटी'त मतदान जनजागृती

## विद्यार्थिनींनी सादर केला पोवाडा; 'स्वीप'च्या माध्यमातून उपक्रम

मुंबई, ता. १७ : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी नवीन पात्र मतदारांची नोंदणी वाढवणे; तसेच जिल्ह्यामध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या दृष्टीने जनजागृती केली जात आहे. त्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत एसएनडीटी महिला विद्यापीठात नुकताच कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी एसएनडीटी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींद्वारे मतदान जनजागृतीसाठी पोवाडा सादर करण्यात आला. हा पोवाडा धनश्री कारोद, ज्ञानेश्वरी दळवी आणि अनुश्री वैद्य यांनी सादर केला.

मुंबई शहर जिल्ह्यात 'स्वीप'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी प्रतिनिधींच्या माध्यमातून ईव्हीएम व व्हीव्हीपॅटसंदर्भात जनजागृती तसेच पथनाट्य स्पर्धांसह प्रभातफेरीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे.

'स्वीप'च्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजवावा, मतदान प्रक्रियेविषयी जागरूकता वाढावी, मतदान प्रक्रियेत सामान्य मतदाराचा सहभाग वाढावा, लोकशाहीला खऱ्या अर्थाने लोकसहभागात्मक लोकशाही बनविणे हा 'स्वीप'चा मूळ उद्देश आहे. त्यामुळे समाजमाध्यमांद्वारेही मतदान जनजागृतीचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे निवडणुकीत मतदानाची टक्केवारी नक्कीच वाढेल, असा विश्वास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी व्यक्त केला. यावेळी शाळा, महाविद्यालयांनी घेतलेला पुढाकार उल्लेखनीय असल्याचे स्वीपच्या मुंबई शहर जिल्ह्याच्या प्रमुख समन्वय अधिकारी फरोग मुकादम यांनी व्यक्त केला आहे. कुलाबा विधानसभा मतदारसंघाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.





Principal (Add. Charge)
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.